**कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय, नवी दिल्ली, भारत सरकार यांच्या उपक्रमांतर्गत दिव्यांग (अपंग) व्यक्तींसाठी प्रथम वर्ष २०२६-२७ अभियांत्रिकी पदविका प्रवेश**

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे केंद्रशासन पुरस्कृत दिव्यांग (अपंग) प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी स्थापत्य – 05, यंत्र – 05, विद्युत – 05, माहिती तंत्रज्ञान – 05 अशा एकूण 20 जागांसाठी इयत्ता 10 वी पास दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे.

सदर प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांस एस.एस.सी. परीक्षेत किमान 35% गुण आवश्यक आहेत. तसेच किमान 40% दिव्यांग (अपंग) असल्याचा जिल्हा रुग्णालयाचा दाखला असणे आवश्यक आहे.

अभ्यासक्रमासाठी प्रवेश हा सामान्य उमेदवारांसाठी तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश नियमावलीप्रमाणे व संस्थेमध्ये व्ही. जे. आर. सी. मुंबई यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या वैद्यकीय चाचणीनुसार देण्यात येईल.

या योजनेअंतर्गत प्रवेशार्थीस शैक्षणिक फी माफी, मोफत वसतिगृह, भोजन भत्ता (रु. 1000/- प्रति महिना), पुस्तके व स्टेशनरीसाठी भत्ता (रु. 3000/- प्रति वर्ष) इत्यादी सुविधा केंद्र शासनाच्या नियमानुसार देण्यात येतील.

प्रवेशासाठी दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांनी सामान्य विद्यार्थ्यांसाठी असणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी (Online Registration) www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरून माहिती घेऊन अर्ज करावा.

सुविधा केंद्राकडून (Facilitation Centre) देण्यात येणाऱ्या पावतीची दुय्यम प्रत व हस्तलिखित अर्ज आपल्या दूरध्वनी क्रमांकासह प्रत्यक्ष अथवा पोस्टाने अर्ज भरल्यानंतर सात (07) दिवसांच्या आत शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे सादर करावा.

या संस्थेमध्ये असे अर्ज प्राप्त झालेल्या इच्छुक दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांचे प्रवेशासाठी पात्रता निश्चित करण्यात येईल. या विद्यार्थ्यांनी वैद्यकीय चाचणी व प्रथम फेरी प्रवेश प्रक्रियेसाठी संस्थेत मूळ कागदपत्रे व इतर शुल्क (अंदाजे रु. 3000/-) सह त्यांच्या दूरध्वनीवर कळविण्यात येणाऱ्या दिवशी सकाळी 11.00 वाजता हजर राहावे.

अधिक माहितीसाठी -

श्रीम. ए. एस. शिवाळ ९७३०४७०९२२

श्री. ए .एस. वायचळ ९३२२४५०१५६

यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधावा किंवा संस्थेमध्ये प्रत्यक्ष भेट द्यावी.

(कॅप्टन डॉ नि. पां. सोनजे)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर